# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.08.2025** **वारःशनिवार**

1. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना 12 हजार 60 कोटी रुपये अनुदान कायम ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता
2. पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध प्रकल्पांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, पुण्यासाठी आणखी 5 नवीन पोलीस स्थानकांना मान्यता देणार
3. पुणे जिल्ह्यात तीन नवीन महापालिका उभारणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा आणि
4. राज्यभरात नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा

**केंद्रीय मंत्रीमंडळ**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना वर्ष 2025-26 साठी 12 हजार 60 कोटी रुपये अनुदान कायम ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत 10 कोटी 33 लाखांहून अधिक कुटुंबांना लाभ झाला असल्याचं त्यांनी सांगितलं.

आय ओ सी एल, बी पी सी एल आणि एच पी सी एल या तीन सार्वजनिक क्षेत्रातल्या तेल विपणन कंपन्यांना 30 हजार कोटी रुपयांची भरपाई देखील सरकारनं मंजूर केली आहे. तांत्रिक शिक्षणामधील बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन सुधारणांसाठी 4 हजार 200 कोटी रुपयांचं आर्थिक सहाय्य देण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेअंतर्गत सुमारे 275 सरकारी आणि सरकारी अनुदानित तांत्रिक संस्थांची निवड करून त्यांना आर्थिक मदत देण्यात येईल.

**फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचं काल उद्घाटन करण्यात आलं. पुण्यासाठी आणखी 5 नवीन पोलीस स्थानकांना मान्यता देणार असल्याचं ते म्हणाले. पोलीसांसमोराची आव्हानं, कायदा आणि सुव्यवस्थेचे नवे प्रश्न लक्षात घेवून 60 वर्षांनंतर पोलीस दलाचा नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. पुणे शहरासाठी लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी, येवलेवाडी अशा पाच पोलीस स्थानकांची मागणी केली असून त्यास मंजुरी देण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या एक हजार क्षमतेच्या मनुष्यबळाला मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. पुण्याचा वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी उपग्रहाचा उपयोग करून अत्याधुनिक एकात्मिक वाहतूक नियंत्रण प्रणाली उभारण्यात येणार आहे. पोलीसांना चांगली सुविधा मिळत असताना तक्रार घेवून आलेल्या नागरिकांना न्याय मिळावा यासाठी पोलिसांनी विशेष प्रयत्न करावे असं उप-मुख्यमंत्री अजित पवार याप्रसंगी म्हणाले.

**पायाभूत सुविधा-मुख्यमंत्री**

राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांची गतीनं उभारणी करून सर्व यंत्रणांनी एकत्रितरित्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट साध्य करावं, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे इथं आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते…..

**आमच्या वॉर रूमच्या माध्यमातून ज्या प्रोजेक्ट्सचं आम्ही मॉनिटरिंग करतोय ते नऊ लाख कोटी रुपयांचे प्रोजेक्ट्स आहेत त्यामुळे अशा प्रकारे सगळे प्रोजेक्ट हे जर कॉर्डिनेशन ने केले तर वेगाने आपले इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट पूर्ण होऊ शकतील राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच राज्य सरकारच्या वतीनं इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात एक मोठा प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम हातामध्ये घेण्यात आला आहे यातनं पुढच्या काळामध्ये पायाभूत सेवा प्रकल्प जे आहेत त्याला चालना देण्याकरता आपल्याला मोठा फायदा होईल.**

पायाभूत प्रकल्प हे विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत महत्त्वाचे पाऊल असून विकसित राज्याच्या विकासदृष्टीचे आणि धोरणाचे साक्षीदार आहेत. या कार्यशाळेचा उद्देश केवळ माहिती देणं नव्हे तर, सक्षम प्रशासकीय नेतृत्व तयार करणं हा आहे. शासनातील प्रत्येक अधिकारी हा विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा भाग आहे. यामुळे अशा प्रशिक्षण कार्यशाळा म्हणजेच परिवर्तनाची बीजं आहेत, अशी भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

**तीन महापालिका- अजित पवार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल चाकण औद्योगिक क्षेत्रातील नागरी समस्यांची पाहणी केली, यावेळी त्यांनी चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी अशा तीन महापालिका केल्या जातील अशी घोषणा केली....

**पूर्वीचा आपला राजगड नगरचा परिसर आणि त्याच्यानंतर झालेली आपली इंडस्ट्री मी आपल्याला सांगतो तुम्हाला आवडो किंवा न आवडो कदाचित आपल्याला नजीकच्या काळामध्ये चाकण आणि या सगळ्या परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी आणि बाकीच्या ज्या काही रुंद रस्ते अंडरग्राउंड ड्रेनेज स्ट्रॉन्ग वॉटर जाण्याची व्यवस्था अशा अनेक बाबी असतात याप्रकारे आपल्याला ते करावं लागेल काळानुरूप निर्णय घ्यावे लागतात.**

**नारळी पौर्णिमा**

नारळी पौर्णिमेचा सण काल राज्यभरात उत्साहात साजरा करण्यात आला. कोळी बांधवांनी समुद्रकिनारी दर्याची पूजा करून पारंपरिक नृत्यात सहभाग घेतला. मासेमार बांधव या दिवशी सोन्याचा प्रतिकात्मक नारळ समुद्रात अर्पण करुन कृतज्ञता व्यक्त करतात आणि यापुढे मासेमारी करण्यासाठी उत्तम काळ जावा अशी प्रार्थना करतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवकालीन परंपरेनुसार मालवणमध्ये हजारो मालवणवासी, मासेमार आणि व्यापाऱ्यांनी ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्यावरून सागराला मानाचं श्रीफळ अर्पण करून "मालवणच्या व्यापार-उद्योगाला आणि मासेमारीला बरकत दे," अस साकडं समुद्राच्या चरणी घातलं. वेंगुर्ले, सावंतवाडी, कुडाळ इथं परंपरेनुसार नारळ अर्पण करण्याचे कार्यक्रम झाले. रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाकडून समुद्राला मानाचा नारळ अर्पण करण्यात आला. मिरवणुकीनं वाजतगाजत हा नारळ रत्नागिरी शहरातल्या मांडवी किनाऱ्यावर आणण्यात आला.

आज रक्षाबंधनाचा सण आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रक्षाबंधनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. समाजात सुसंवाद आणि एकतेची भावना वाढवणारा हा सण आहे असं त्यांनी म्हटल आहे.

**धान्यापासून राखी- हिंगोली**

हिंगोली जिल्ह्यातल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या आहेत. धान्यापासून बनवलेल्या या राख्यांविषयी जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून...

**यामध्ये कृषीसंस्कृती, निसर्गाचे नाते आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन दिसून येतो. विद्यार्थ्यांनी तयार केलेली राख्या या तांदूळ, काळे तीळ आणि फुलांच्या पाकळ्यांपासून तयार केल्या आहेत. या पर्यावरण पूरक राख्यांतून शेतीमालाचे कौतुक करतानाच सर्व सण, उत्सव हे पर्यावरणस्नेही स्वरूपाने साजरे झाल्यास निसर्गाचा समतोल राखता येतो याचा**

**संदेश देत आहेत. या राख्या तयार करताना विद्यार्थ्यांनी जोपासलेली कलेची, सृजनशीलतेची आणि भारतीय संस्कृतीची अनोखी सांगड दिसून येत आहे. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या या राख्यांचे प्रदर्शन शाळेत भरविण्यात आले आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.**

**अधिवेशन**

महात्मा गांधींनी पुकारलेल्या भारत छोडो आंदोलनाला आज 83 वर्ष पूर्ण होत आहेत. संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे भारत छोडो आंदोलनातल्या स्वातंत्र्यसैनिकांना काल आदरांजली वाहण्यात आली. बिहारमधलं मतदारयाद्यांचं पुनरिक्षण आणि इतर विविध मुद्द्यांवर विविध पक्षांकडून आलेले 20 स्थगन प्रस्ताव राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी फेटाळल्यानंतर निषेध म्हणून सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज आधी 12 वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

**पिंक ई-रिक्षा-कोल्हापूर**

पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत, महाराष्ट्र सरकार प्रत्येक ई-रिक्षाच्या किमतीवर 20 टक्के अनुदान देणार आहे. वर्षभरात महाराष्ट्रातील 10 हजार महिला लाभार्थ्यांना या रिक्षांचं वितरण होणार आहे असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल कोल्हापुरात सांगितलं. तटकरे यांच्या हस्ते पिंक ई रिक्षा आणि रुपे कार्डचं वितरण करण्यात आलं त्यावेळी त्या बोलत होत्या. जीपीएस सिस्टीमसह रिक्षात बसलेल्या व्यक्तीचं छायाचित्र काढण्याची सुविधा या रिक्क्षात आहे.

**ईनाम**

देशातील बाजार समित्या आपापसात जोडल्या जाव्यात, कुठूनही शेतमालाचे खरेदी विक्री व्यवहार करता यावेत यासाठी राज्य शासनाच्या वतीने ई नाम ही डिजिटल सेवा सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापाऱ्यांनी प्रथमच जम्मू कश्मीर मधील सफरचंद आणि पियरची खरेदी केली. अकरा टनापेक्षा जास्त खरेदी झाल्याची माहिती राज्य पणन मंडळाकडून देण्यात आली आहे.

**चित्र-प्रदर्शन-हिंगोली**

केंद्र सरकारची 11 वर्षे-सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाची या संकल्पनेवर आधारित सरकारच्या वतीनं देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या नांदेड इथल्या केंद्रीय संचार ब्यूरोच्या वतीनं आठवं ज्योर्तिलिंग असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ इथं येत्या सोमवारपासून तीन दिवस मल्टिमिडीया चित्र प्रदर्शन भरविण्यात येत आहे. भारतानं विविध क्षेत्रांमध्ये केलेली कामगिरी, विकास आणि योजनांची माहिती या प्रदर्शनातून देण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात जिल्हा पाणी आणि स्वच्छता मिशन कक्षाच्या माध्यमातून घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता, स्वातंत्र्याचा उत्सव, अशा मोहिमा प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सहभागी व्हावं असं आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी केलं आहे.

**हवामान**

कोकणात बहुतांश ठिकाणी तर इतर विभागांमध्ये कमी अधिक प्रमाणात पावसाचा अंदाज असून तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.